। बीड-महाराष्ट्र । मंगळवार दि.२४ मार्च २०२६ । वर्ष ६ वे । अंक ०५ । पान २ । पाने ४ । किंमत ३ रूपये

महाराष्ट्राचा बुलंद आवाज । दैनिक

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे । मो. : 9822152955 | E-mail : dailymarathwadapatra2021@gmail.com

। RNI/MAHMAR/2021/80074 । Post : Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-27 । https://marathwadapatra.com । https://epaper.marathwadapatra.com










## डोनाल्ड ट्रम्प यांची घोषणा...

# अमेरिका-इराण युद्धाला 'ब्रेक'

मुंबई । वृत्तसेवा

अमेरिका, इस्त्रायल आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मोठी घोषणा केली आहे. इराणवरील लष्करी हल्ले तात्पुरते थांबवण्यात आले असून, पुढील निर्णय चर्चेनंतर घेतला जाईल, असे ट्रम्प यांनी जाहीर केले आहे.



### युद्ध थांबण्याची शक्यता?

अमेरिका आणि इराण यांच्यात चर्चा सुरू झाल्यामुळे युद्धविरामाची शक्यता निर्माण झाली असली, तरी अंतिम निर्णय पुढील चर्चेनंतरच घेतला जाणार आहे. आंतरराष्ट्रीय राजकीय विश्लेषकांच्या मते, जर चर्चा यशस्वी झाली तर मध्यपूर्वेतील तणाव कमी होऊ शकतो, अन्यथा पुन्हा लष्करी कारवाई सुरु होण्याची शक्यता आहे.

### पावर प्लांटवरील हल्ले ५ दिवसांसाठी पुढे ढकलले

डोनाल्ड ट्रम्प यांनी सोशल मीडियावर केलेल्या पोस्टमध्ये सांगितले की, गेल्या दोन दिवसांत अमेरिका आणि इराण यांच्यात सकारात्मक चर्चा झाली असून, पुढील एक आठवडा ही चर्चा सुरू राहणार आहे. मी अमेरिकेच्या संरक्षण विभागाला इराणच्या वीज प्रकल्प आणि ऊर्जा पायाभूत सुविधांवर होणारे सर्व लष्करी हल्ले पाच दिवसांसाठी स्थगित करण्याचे निर्देश दिले आहेत, अशी माहिती ट्रम्प यांनी दिली. तसेच, मध्यपूर्वेतील तणाव पूर्णपणे संपवण्यासाठी दोन्ही देशांमध्ये गंभीर चर्चा सुरू असल्याचा दावा त्यांनी केला.

### होर्मुज सामुद्रधुनीवरून आधी दिली होती धमकी

विशेष म्हणजे, या घोषणेच्या एक दिवस आधीच ट्रम्प यांनी इराणला स्ट्रेट ऑफ होर्मुझ बाबत कडक इशारा दिला होता. त्यांनी सांगितले होते की, जर इराणने ४८ तासांत होर्मुझ सामुद्रधुनी खुली केली नाही, तर इराणच्या वीज प्रकल्पांवर हल्ले केले जातील. मात्र आता चर्चेची प्रक्रिया सुरु झाल्यामुळे अमेरिकेने हल्ले तात्पुरते थांबवले आहेत.

# मजुराने गळफास घेत संपवले जीवन

परळी । प्रतिनिधी

**परळी तालुक्यातील घटना**

पैशाच्या कारणावरून वारंवार जातीय शिवीगाळ व दमदाटी सहन करावी लागल्याने नैराश्यात जाऊन एका मजुराने गळफास घेऊन जीवन संपविल्याची धक्कादायक घटना पौळ पिंपरी येथे उघडकीस आली आहे. या प्रकरणी सिरसाळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक माहितीनुसार, मृत कुंडलिक पिराजी वैराळ रा. पौळ पिंपरी, ता. परळी वैजनाथ यांनी शुक्रवार (दि.२०) रोजी रात्री ११ वा. ते दि. २१ मार्च २०२६ रोजी सकाळी ८ वाजण्याच्या दरम्यान आरोपी राम महादेव पौळ यांच्या मालकीच्या पत्र्याच्या शेडमध्ये सुताच्या दोरीने गळफास घेऊन जीवन संपविले.या घटनेप्रकरणी मृताची पत्नी शांताबाई ▶▶ पान २ वर

# भरदिवसा साडेपाच लाखांची रोकड लंपास

नेकनूर । प्रतिनिधी

**नेकनूर येथील घटना**

आहिल्यानगर येथून मार्केटींग करण्यासाठी आलेल्या सुनिल कुलकर्णी यांची ५ लाख ५३ हजार ९०० रूपये असलेली बॅग त्यांच्याच कार चालकाने लंपास केल्याचा प्रकार रविवार (दि.२२) रोजी नेकनूर येथे घडला. या प्रकरणी कुलकर्णी यांच्या फिर्यादीवरून त्यांच्या गाडीचा चालक अमोल चंद्रकांत बरफे याच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अहिल्यानगर येथील सुनिल भास्कर कुलकर्णी (वय ५९) या मार्केटींग व्यवसायिकाने नेकनूर पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, मार्केटींगचे कामकाज करत असतांना माझ्या गाडीचा चालक अमोल चंद्रकांत बरफे रा. मिरी अडगाव ▶▶ पान २ वर

# जिल्हा प्रशासन गोट्या खेळतंय काय? स्थानिक वृत्तपत्रांची आर्थिक कोंडी!

### ५० लाखांची जाहिरातींची देयके रखडवणा-या जिल्हा प्रशासनाच्या निषेधार्थ! जिल्हाधिकारी कार्यालयासमोर 'गोट्या खेळत' लक्ष्यवेधी आंदोलन-डॉ.गणेश ढवळे




बीड । प्रतिनिधी

एकीकडे शासन पारदर्शकतेचे दावे करत असताना, बीड जिल्ह्यातील प्रशासकीय यंत्रणा मात्र स्थानिक वृत्तपत्रांच्या जाहिरातींची बिले अडवून त्यांची आर्थिक कोंडी करण्याचा प्रयत्न जिल्हा प्रशासनाकडून होत असुन गळचेपी करत आहे .जिल्ह्यातील विविध भूसंपादन कार्यालयांमार्फत देण्यात आलेल्या जाहिरातींची सुमारे ५० लाख रुपयांची देयके तब्बल १० वर्षांपासून प्रलंबित असल्याने संताप व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते तथा बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे मुख्य प्रचार प्रमुख डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांच्या नेतृत्वाखाली आज (दि.२३, सोमवार) जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अनोखे 'गोट्या खेळत' लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात आले. जिल्हा प्रशासन गोट्या खेळतंय काय? असा सवाल करत प्रशासनाचा निषेध नोंदवण्यात आला. दफ्तर दिरंगाई करणा-या आधिका-यांवर प्रशासकीय व दंडात्मक कारवाईची मागणी करण्यात आली. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच पालकमंत्री सुनेत्रा पवार यांना निवेदन सादर करण्यात आले. ▶▶ पान २ वर

# मराठवाड्यातील रेल्वे सुविधात वाढ करा

### खा.सोनवणेंची रेल्वे मंत्र्यांकडे मागणी

बीड । प्रतिनिधी



बीड, परळी, धाराशिवसह संपूर्ण मराठवाड्यातील रेल्वे प्रवाशांच्या सोयीसाठी नवीन गाड्या, महत्त्वाच्या स्थानकांवर थांबे आणि पायाभूत सुविधांमध्ये वाढ करण्याची मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी रेल्वे मंत्र्यांकडे केली आहे. रेल्वे मंत्री यांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे, मराठवाड्याच्या सर्वांगीण विकासासाठी रेल्वेचे जाळे विस्तारणे अत्यंत गरजेचे आहे. धाराशिव-बीड-छत्रपती संभाजीनगर या नवीन रेल्वे मार्गाच्या 'डीपीआर'साठी (सविस्तर प्रकल्प अहवाल) सर्वेक्षण मंजूर करण्यात आले असून, यामुळे जिल्ह्याच्या दळणवळण क्षेत्रात क्रांती होणार आहे. बीड, परळी, धाराशिवसह संपूर्ण मराठवाड्यातील रेल्वे प्रवाशांच्या सोयीसाठी नवीन गाड्या, महत्त्वाच्या स्थानकांवर थांबे आणि पायाभूत सुविधांमध्ये वाढ करण्याची गरज आहे. गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला बीडकरांचा रेल्वेचा प्रवास आता सुखकर झाला आहे. १८ सप्टेंबर २०२५ पासून अहिल्यानगर-बीड 'डेमू' रेल्वे सेवा अधिकृतपणे सुरू करण्यात आली आहे. मराठवाड्यातील महत्त्वाचे जंक्शन असलेल्या परळी वैजनाथ रेल्वे स्थानकाचा समावेश 'अमृत भारत स्टेशन योजने'त करण्यात आला आहे. या अंतर्गत स्थानकावर जागतिक दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. सद्यस्थितीत येथे अत्याधुनिक प्लॅटफॉर्म शेडचे काम पूर्ण झाले आहे. वृद्ध व दिव्यांग प्रवाशांसाठी एस्केलेटर ▶▶ पान २ वर

## संपादकीय

# कोकणचा राजा जायबंदी!

फेब्रुवारी ते जूनदरम्यान मुंबईच्या फळ मार्केटमध्ये हापूस आंब्याच्या विक्रीला मोठी गती मिळत असून गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर कोट्यवधींची उलाढाल झाली. रत्नागिरी व देवगड हापूसची आवक अवकाळी पाऊस आणि कीड हल्ल्यांमुळे घटली असून त्यामुळे दर गगनाला भिडले आहेत. आखाती युद्धामुळे निर्यात ठप्प झाल्याने यंदा स्थानिक बाजारात हापूस आंबा मुबलक प्रमाणात उपलब्ध झाला आहे. फेब्रुवारी ते जून या पाच महिन्यांच्या कालावधीत मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या फळ मार्केटमधील उलाढालीला कमालीची गती मिळालेली असते. फळ मार्केटमध्ये देशाच्या कानाकोपऱ्यांतून तसेच परराज्यातूनही फळे विक्रीला येत असतात. या मार्केटमध्ये देशाच्या अनेक राज्यांतून आंबे विक्रीला येत असले तरी कोकणचा हापूस हा आंबा खवय्यांच्या पसंतीचा असतो. वर्षभर वाट पाहिलं, पण खाल्ला तर हापूसच खाईन, असे आंबाप्रेमी अभिमानाने सांगत असतात. गुढीपाडवा, अक्षय्य तृतीया, राम नवमी व अन्य सणांना घराघरांमध्ये हापूस आंब्याच्या रसाचा कार्यक्रम ठरलेलाच असतो. त्यामुळे अन्य दिवसांच्या तुलनेत या दिवसांसाठी आंबा विक्रीच्या उलाढालीचा आलेख कमालीचा उंचावलेला असतो. कोकणच्या रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग अशा तीन जिल्ह्यांतून मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, कल्याण–डोंबिवली, नवी मुंबई, पनवेल येथील नागरिकांसाठी आंबा विक्रीला येत असला तरी रायगडच्या तुलनेत रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील हापूसला अधिक मागणी असते व चवीचा दर्जाही काही वेगळाच असतो. भाज्या आणि फळभाज्या मार्केटमध्ये विक्रीला शेतकऱ्यांकडून थेट येत असतात. हापूस आंब्याचे गणित त्या तुलनेत वेगळे असते. मार्केटमध्ये आंबा उत्पादक शेतकऱ्यांनी आंबा थेट विक्रीला पाठविण्याचे प्रमाण नगण्य असते. मार्केटमधील व्यापारीच कोकणात जाऊन थेट बागांचाच सौदा करत असल्याने फळांचे पैसे शेतकऱ्याला जागेवरच उपलब्ध होत असतात. गुढीपाडव्याच्या दिनी मार्केटमध्ये कोट्यवधी रुपयांची उलाढाल आंबा विक्रीतून झालेली आहे. खवय्यांची आंब्याला असलेली पसंती पाहून अन्य राज्यातील आंबा उत्पादक महाराष्ट्रातील शहरी भागातील मार्केटमध्ये आंबा विक्रीला पाठवत असतात. कोकणच्या हापूसच्या खालोखाल कर्नाटकच्या आंब्याने मार्केट व्यापलेले असते. एपीएमसी मार्केटमधील प्रत्येक विंगमधील गाळ्यागाळ्यावर हापूस आंब्यांनी जागा व्यापलेली आहे. रत्नागिरी जिल्ह्यातून रत्नागिरी, लांजा, राजापूर भागातून तर सिंधुदुर्गचा देवगड हापूस विक्रीला आला आहे. रायगड जिल्ह्यातील किनारपट्टी भागातूनही हापूस आंबा विक्रीला आला आहे. जानेवारी महिन्यापासूनच हापूस आंब्याची मार्केटला तुरळक आवक येण्यास सुरुवात होते, एप्रिलच्या मध्यापासून हापूस आंब्याची आवक वाढून दररोज लाखांच्या संख्येने हापूस आंब्याच्या पेट्या मार्केटमध्ये विक्रीला येत असतात. आवक वाढल्यावर याच कालावधीत हापूस आंब्याचे दर सर्वसामान्यांच्या आवाक्यात येतात. मार्केटमध्ये कोकणच्या हापूस आंब्याव्यतिरिक्त केरळ, कर्नाटक आणि आंध्र प्रदेशातूनही काही प्रमाणात 'हापूस' सदृश आंबा विक्रीसाठी येत असतो. दरवर्षीच्या तुलनेत हापूस आंब्याची आवक कमी झालेली आहे. फुलोऱ्याच्या वेळी झालेल्या अवकाळी पावसामुळे आणि कीड हल्ल्यांमुळे आंब्याच्या काढणीला विलंब झाला असून, रत्नागिरी आणि देवगड हापूसची आवक घटली आहे आणि शहरभरातील हंगामाच्या सुरुवातीच्या पुरवठ्याचे स्वरूप बदलले आहे. आंबा आवकच मंदावल्याने किमती गगनभरारी घेत आहेत. हापूसचे दर ५ ते ९ डझनाच्या पेटीचे २ ते ८ हजार रुपये आहेत. आखाती युद्ध सुरू असल्याने हापूस आंब्याची हक्काची बाजारपेठ ओळखली जाणाऱ्या आखाती देशांमध्ये हापूसची निर्यात अजून सुरू झालेली नाही व युद्धामुळे लवकर निर्यात होण्याची शक्यताही नाही. त्यामुळे स्थानिक बाजारातील मार्केटमध्ये आंबा विकला जाणार असल्याने यंदा खवय्यांना आंबा मुबलक प्रमाणावर उपलब्ध होणार आहे. गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर मुंबई शहर व उपनगरामध्ये जवळपास ३२ कोटी ५० लाख रुपयांच्या आंब्याची विक्री झाली आहे. यामध्ये १० कोटी रुपयांच्या कर्नाटक आंब्याची, तर उर्वरित २२ कोटी ५० लाख रुपयांच्या कोकणमधून आलेल्या हापूस आंब्याची विक्री झालेली आहे. युरोपीय देशांमधून हापूस आंब्याला फारशी मागणी नसल्याने आंबा उत्पादक शेतकऱ्यांना आखाती देशांमधील बाजारपेठांवर अवलंबून राहावे लागत आहे. आखाती युद्धामुळे रमजानचा महिना असतानाही अन्य फळांची विक्री न झाल्याने फळ उत्पादकांना यंदा प्रचंड फटका बसला आहे. इराण आपला फळांचा मुख्य ग्राहक असून कलिंगड, डाळिंबसह अन्य भारतीय फळांना रमजानच्या महिन्यात इराणमधून सर्वाधिक मागणी असते. त्याखालोखाल अन्य आखाती देशांतून विशेषत: दुबईतून अधिक मागणी असते. सध्या आखाती युद्ध सुरू असल्याने निर्यातदार व्यापाऱ्यांचे नुकसान प्रचंड झाले आहे. त्यांना शेतकऱ्यांच्या बागा विकत घेऊन त्यातील आंबे आता स्थानिक बाजारांमध्ये विकण्याची वेळ आलेली आहे. हापूसला असलेली मागणी व मिळणारा दर पाहून देशातील अन्य आंबा हापूसच्या नावाखाली विकण्याचा प्रकारही काही ठिकाणी होत असतो. खऱ्या खवय्यांना हापूस आंबा लगेच ओळखता येतो आणि इतरांच्या नशिबी फसगत येते. कोकणचा हापूस हा रंगावरून नाही तर गंधावरून ओळखता येतो. त्यामुळेच हापूस घेताना आधी वास घ्या, रंग पाहू नका. खऱ्या कोकण हापूसला एक तीव्र, नैसर्गिक सुगंध असतो जो दुरूनही जाणवतो, अशी माहिती आंबा खवय्यांकडून देण्यात येते. पिकल्यावर हापूस आंबे गडद केशरी–पिवळे असतात. ते कधीही निस्तेज किंवा डागाळलेले नसतात. आंब्याची पातळ, नाजूक त्वचा जी स्पर्शाला मऊ आणि मुलायम वाटते. हापूसच्या नावाखाली स्थानिक बाजारामध्ये अधिक नफा कमविण्यासाठी अन्य जातीचे आंबे बनावट हापूस म्हणून विकण्याचा प्रकार घडत असतो. जाड साल, अधिक टणकपणा, अधिक तंतुमय पोत आणि लक्षणीयरीत्या कमी सुगंध ही अल्फोन्सो नावाने विकल्या जाणाऱ्या दक्षिणेकडील जातींची वैशिष्ट्ये आहेत. एपीएमसी मार्केट, दादर मार्केट, क्रॉफर्ड मार्केट आणि मुंबई शहर व उपनगरातील आंबा व्यापारी ग्राहकांची आंबा मागणी पूर्ण करण्यासाठी दक्षिणेकडील आंब्यांच्या जातीचा साठा करत आहेत, तर दुसरीकडे अस्सल देवगड हापूस दुर्मीळ, महागडा असून खरेदीदारांना तो ओळखणे दिवसेंदिवस कठीण होत आहे.

## बीडच्या जनतेला केला सन्मान समर्पित

# माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांना 'चंपावतीरत्न' पुरस्कार प्रदान

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांना नुकताच प्रतिष्ठित 'चंपावतीरत्न' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या सोहळ्यात बोलताना त्यांनी आपल्या कार्याचे श्रेय जनतेला देत, जिल्ह्याच्या प्रलंबित प्रश्नांवर आणि विकासावर भाष्य केले. रविवार दि.२२ रोजी हॉटेल नीलकमल येथे रोटरी क्लब ऑफ बीडच्या वतीनेमाजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांना 'चंपावतीरत्न' पुरस्कार रो.सुधीर लातुरे, मयंक गांधी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी रा.ओम मोतिपवळे, रो.हरीष मोटवाणी, ह.भ.प.धोंडीराज महाराज पाटांगणकर, सुभाषचंद्र सारडा, नितीनचंद्र कोटेचा, समीर काझी, अजित वरपे, दिलीप खिस्ती, सुनिल क्षीरसागर, महेश वाघमारे, ॲड.कालिदास थिगळे, सत्यनारायण लाहोटी, विलास बडगे, दिनकर कदम, गंगाधर घुमरे, प्रा.जगदिश काळे, अरूण डाके,नानासाहेब काकडे,अरुण बोगाने रो.विकास उमापुरकर यांची प्रमुख उपस्थिती होती. पुरस्काराला उत्तर देताना माजी मंत्री क्षीरसागर म्हणाले की, वादापेक्षा विकासावर विश्वास ठेवणार्या जनतेने मला जी साथ दिली, त्यामुळेच हे शक्य झाले. हा पुरस्कार मी बीड जिल्ह्यातील तमाम जनतेला समर्पित करतो. ५० वर्षांपूर्वीचा जिल्हा आणि



आजचा जिल्हा यातला फरक सर्वांच्या समोर आहे. आम्ही सर्वच काही केले असा आमचा दावा नाही, मात्र जे-जे शक्य होते ते करून दाखवले. असे सांगून त्यांनी पाणी प्रश्नावर विशेष भर दिला. ते म्हणाले, मराठवाड्याच्या हक्काचे २८ टीएमसी पाणी लवकरात लवकर मिळावे, हीच आमची मुख्य इच्छा आहे. बीड जिल्ह्यातील मजुरांच्या हाताचा कोयता कायमचा बंद होऊन आपली जमीन पाणीदार व्हावी, हेच आमचे स्वप्न आहे. पुरस्कारामुळे आपली जबाबदारी अधिक वाढल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. विकासासाठी जात, धर्म आणि पंथ बाजूला सारून सर्वांना सोबत घेऊन जिल्ह्याच्या प्रगतीसाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. जिल्ह्यात अजूनही अनेक कामे होणे बाकी आहेत आणि ती पूर्ण करण्यासाठी मी कटिबद्ध आहे. तुमच्या प्रेमाची जी शिदोरी माझ्याकडे आहे, त्या जोरावर मी या जबाबदार्या समर्थपणे पेलण्यास तयार आहे, असा विश्वास त्यांनी व्यक्त करून यावेळी त्यांनी नाव न घेता विरोधकांवरही टीका केली. काही लोक केवळ वरवरचे मुखवटे धारण करून भ्रम निर्माण करत आहेत, मात्र जनतेने चांगल्या–वाईटाची पारख केली पाहिजे, असेही आवाहन त्यांनी केले. याशिवाय रो.हरीष मोटवानी, रो.मोतिपवळे, रो.मयंक गांधी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी बाबुशेठ लोढा, सुधाकर मिसाळ, भास्कर जाधव, सखाराम मस्के, अशोक शेटे, प्रकाश कानगांवकर, अर्जुन बहिरवाळ, राणा चौव्हान, विजय सरवदे, सुर्यकांत महाजन, विशाल क्षीरसागर, प्रमोद करमाळकर, विष्णुदास बियाणी, रामेश्वर कासट, अमोल लहाने, डॉ.महेंद्र गौशाल, डॉ.अरूण भस्मे, किशोर पगारिया, लक्ष्मीकांत सोनी, सुरेंद्र कासट, मनमोहन कलंत्री, जवाहर कांकरिया, राहूल बोरा, रो.सुमित जयस्वाल, रो.सुरेश लड्डा, रो.वाय जनार्दनराव, रो.संतोष पवार, रो.मुकुंद कदम, रो.मेघराज पिंगळे, सुहास बेदरे, गणेश मुळे, संदिप खोड, ओमप्रकाश लोहिया, राम मोटवानी, सुरज लाहोटी, विवेक बडगे, प्रमोद धारवाडकर, कल्याण कुलकर्णी, सुनिल खंडागळे, अशोक राऊत यांच्यासह महिला, पुरूषांची उपस्थिती होती.

# परिवहन महामंडळाच्या ताफ्यात राजमाता जिजाऊ एसटी बस

**मुंबई । वृत्तसेवा**

परिवहन मंडळाने एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. आता एसटी महामंडळात ३ हजार नवीन बसची भर पडली आहे. या आत्याधुनिक स्मार्ट बस असणार आहेत. राज्याच्या सार्वजनिक परिवहन व्यवस्थेत नवीन बस जोडल्या जाणार आहे. या नवीन बसचे उद्घाटन उद्या २४ मार्च रोजी होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या बसेस दाखल होणार आहेत. नवीन राजमाता जिजाऊ एसटी बसमध्ये अनेक आत्याधुनिक बदल असणार आहे. बसमध्ये ३द्व२ आसन रचना असणार आहे. एकूण ५६ आसने असणार आहेत. सध्याच्या बसेसमध्ये ४० सीट असतात. या बसमध्ये १६ सीट जास्त आहेत. या नवीन बसमध्ये ४ सीसीटीव्ही कॅमेरे, जीपीएस, पॅनिक बटण, पब्लिक अनाउन्समेंट सिस्टीम तसेच इलेक्ट्रॉनिक मार्ग फलक असणार आहे. यामुळे प्रवास खूप सुरक्षित होणार आहे. राजमाता जिजाऊ एसटी बस दोन शहरांमध्ये चालवल्या जाणार आहे. जास्त गर्दीच्या ठिकाणी शटल सेवेसाठी चालवण्यात येणार आहे. यामुळे प्रवासाचा वेळ वाचणार आहे. या नवीन बसेस पहिल्यांदा नागपूरमध्ये दाखल होणार आहे. सुरुवातीला ५०




बस चालवल्या जाणार आहेत. नागपूरमधून या बसेसची सुरुवात होणार आहे. या बसला राजमाता जिजाऊ नाव देण्यामागे हिंदवी स्वराज्याच्या प्रेरणास्थान असलेल्या जिजाऊसाहेबांना अभिवादन करण्याची भावना आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मागील संस्कार म्हणजे राजमाता जिजाऊ. या मातृशक्तीचा गौरव या नावातून केला जाणार आहे. एसटी महामंडळाने याआधी शिवनेरी, शिवशाही, शिवाई, यशवंती आणि हिरकणी अशी नावे दिली आहे. यात आता राजमाता जिजाऊ नावाची भर पडली आहे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशाचा सन्मान अधिक समृद्ध झाला आहे, असेही मंत्री सरनाईक यांनी सांगितले.

पान १ वरून

### मजुराने गळफास...

कुंडलिक वैराळ (वय ५५) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आरोपी राम महादेव पौळ (रा. पौळ पिंपरी) याच्याविरुद्ध सिरसाळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादीत नमूद केल्यानुसार, आरोपी हा पैशाच्या वादातून वारंवार जातीय शिवीगाळ करून दमदाटी करत होता. सततच्या मानसिक छळाला कंटाळून व नैराश्यात जाऊन कुंडलिक वैराळ यांनी जीवन संपविल्याचा आरोप करण्यात आला आहे. सदरील घटनेची नोंद रविवार (दि.२२) रोजी करण्यात आली असून, पुढील तपास माजलगाव उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके हे करीत आहेत.

### भरदिवसा साडेपाच...

ता. पाथर्डी जि. अहिल्यानगर याने गाडीतील मार्केटींगचे जमा केलेले ५ लाख ५३ हजार ९०० रूपये चोरून नेले. सदरील रक्कम एका बॅगमध्ये ठेवण्यात आली होती. ती बॅग गाडीमध्येच ठेऊन कुलकर्णी हे नेकनूर येथील अमोल मशिनरी या दुकानात गेले असता त्यांच्या गाडीच्या चालकाने ते येईपर्यंत पैशांची बॅग लंपास केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. या प्रकरणी अशोक बरफे याच्याविरूध्द नेकनूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असुन पुढील तपास पोउपनि धायगुडे करीत आहेत.

### मराठवाड्यातील रेल्वे...

(स्वयंचलित जिने) बसवण्यात आले आहेत. प्रवाशांच्या सुलभ येण्या–जाण्यासाठी १२ मीटर रुंदीच्या भव्य 'फूट ओव्हर ब्रिज'चे काम पूर्णत्वास गेले आहे. दरम्यान, अजून काही सुविधा देणे बाकी असून त्या सुविधात वाढ करावी, असेही म्हटले आहे. ✲ बीडचा विकास हाच माझा केंद्रबिंदू आहे. रेल्वे सुविधांचा विस्तार केवळ प्रवासासाठी नाही, तर उद्योगांच्या वाढीसाठीही आवश्यक आहे. धाराशिव–बीड–संभाजीनगर मार्गाचे सर्वेक्षण ही एक मोठी सुरुवात आहे. जनतेच्या सोयीसाठी माझा पाठपुरावा यापुढेही असाच सुरू राहील. –खा.बजरंग सोनवणे, बीड लोकसभा.

### जिल्हा प्रशासन गोट्या...

✲ वृत्तपत्रांची आर्थिक कोंडी : प्रलंबित देयकांमुळे स्थानिक वृत्तपत्रांची आर्थिक स्थिती डळमळीत झाली आहे. वारंवार निवेदने, पाठपुरावा आणि आंदोलने करूनही केवळ आश्वासने मिळाली; प्रत्यक्ष निधी मात्र मिळालेला नाही. त्यामुळे पत्रकारिता क्षेत्रावरच आर्थिक संकट ओढवल्याचे आंदोलनकर्त्यांचे म्हणणे आहे. ✲ आंदोलनात सहभागी : या आंदोलनात माहिती अधिकार कार्यकर्ते शेख युनुस चऱ्हाटकर, सुदाम तांदळे, मुबीन शेख, पांडुरंग हराळेतसेच बाळासाहेब मोरे पाटील (प्रदेशाध्यक्ष, शिवशक्ती–भिमशक्ती विचारमंच), सादेक सय्यद (शहराध्यक्ष, आम आदमी पार्टी – बीड), रामधन जमाले (जिल्हाध्यक्ष, इंटक) , सामाजिक कार्यकर्ते बाजीराव ढाकणे, किष्किंधा पांचाळ ( अध्यक्ष विश्वकल्याण सेवा भावी संस्था बीड)आदी सहभागी झाले होते. ✲ प्रमुख मागण्या : १) प्रलंबित ५० लाख रुपयांची देयके तातडीने मंजूर करावीत. २) मंत्रालयाने दाखवलेल्या तांत्रिक त्रुटी त्वरित दूर करून प्रस्ताव पुन्हा सादर करावेत. ३) संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करावी. ४) स्थानिक वृत्तपत्रांची आर्थिक पिळवणूक थांबवावी.




Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com